# <u>प्रसिध्दीसाठी</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निमुर्लन व पुनर्वसन विभागामार्फत प्रधानमंत्री आवास योजना राबविणेत येत असुन या योजनेमध्ये निवड झालेल्या लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करणेसाठी अंतिम मुदत <u>दि.३० सप्टेंबर २०२१ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत</u> असुन कागदपत्रे मुदतीत सादर न केल्यास सदर लाभार्थ्यांचे नाव निवड यादीतुन रद्द करण्यात येईल .तरी या योजनेत निवड झालेल्या व अद्यापपर्यंत कागदपत्रे सादर न केलेल्या लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्र सादर करावीत असे आवाहन आयुक्त राजेश पाटील यांनी केले आहे.

सदर योजनेत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी **रावेत येथे ९३४, बोऱ्हाडेवाडी येथे १२८८, चऱ्होली येथे १४४२**असे एकुण ३६६४ सदनिका वाटप करणेसाठी योजना राबविणेसाठी मान्यता देण्यात आली आहे.निवड झालेल्या परंतु कागदपत्रे सादर करणे करीता उपस्थित न राहिलेल्या लाभार्थ्यांची यादी **झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाच्या** नोटीस बोर्डवर लावणेत आली असुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर **<u>(www.pcmcindia.gov.in/marathi/pmay_iresult.php)</u>** देखील सदर यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी, या योजनेत निवड झालेल्या व अद्याप पर्यंत कागदपत्रे सादर न केलेल्या लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत असे आवाहन करण्यात येत आहे .

(अण्णा बोदडे)
सक्षम प्राधिकारी
तथा
सहाय्यक आयुक्त
झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

Scanned with CamScanner